दिनांकः24 फेब्रुवारी,2014

# <u>एनडीए आणि त्यांचा शेवटचा मैल</u>

**-अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

जसजशा लोकसभा निवडणुका 2014 जवळ येत आहेत, राजकीय तर्कवितर्क सुरु झाले आहेत. दिल्लीचे सर्व काही माहित असलेले कयास लावण्यात गर्क झाले आहेत जे वास्तविक हकिकत पासून अलिप्त आहेत. हे त्यांचे आपले आकलन आहे किंवा जन सर्वेक्षणाचे संकेत आहेत. 13 सप्टेंबर,2013 पर्यंत जेव्हा भाजपाने पंतप्रधानपदासाठी नरेंद्र मोदी यांचे नाव घोषित केले, तोपर्यंत कयास लावले जात होते की काय पार्टी कोणत्या एका व्यक्तीला यासाठी सादर करेल का. त्याचबरोबर असा युक्तीवादही केला जात होता की, शासनाचा मुद्दा आणि सरकारच्या विरोधात एन्टी इनकम्बसी होईल आणि निवडणुकात ध्रुवीकरण होईल. मागील 25 वर्षात मी ज्या रॅली पाहिल्या आहेत त्यांच्या तुलनेत मोदी यांच्या रॅलींचा आकार अतिविशाल आहे. 1989 नंतर मी कधीही पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये इतका उत्साह पाहिला नाही, फक्त 1998 आणि 1999 मध्ये अशी स्थिती पाहावयास मिळाली जेव्हा अटलजींना भारताच्या राजनितीक क्षितीजावर पंतप्रधानपदाच्या रुपात सर्वात अधिक स्वीकार्य उमेदवार मानले गेले होते. यानंतर चर्चेचा दुसरा प्रश्नं आहे की, कोण अन्य लोक भाजपाला समर्थन देतील? काय कोणता नवा सहयोगी भाजपासोबत जोडला जाईल? आमच्या अंतर्गत आकलना नुसार- अनेक सहयोगी निवडणुकीच्या आधी किंवा निवडणुकीच्या नंतर भाजपाबरोबर जोडले जातील, फक्त एक मजबुत भाजपा झाली पाहिजे.

नुकत्याच एका प्रतिष्ठित एजेंसी एसी नीलसन यांनी एबीपी न्यूज चॅनेलसाठी सर्वेक्षण केले. मी कधी या सर्वेक्षणांच्या सत्यतेची पुष्टी केली नाही. जर जन सर्वेक्षण विश्वसनीय असतील तर मी त्यांना सूचक मानतो.

हे जन सर्वेक्षण काय संकेत देत आहेत. या जन सर्वेक्षणामुळे स्पष्ट संकेत मिळतात की पुढील निवडणुकांत एक पक्ष असेल जी शेकड्याने असेल. ही शक्यतो 200 चा आकडा पार करील. तिच्या सहयोगींना सुद्धा काही जागा मिळतील. भाजपाला भारताच्या उत्तर, केंद्रीय आणि पश्चिम भागातील राज्यांमध्ये अनेक जागा मिळतील. पूर्व आणि दक्षिणेकडे असलेल्या बिहार आणि कर्नाटकात ती पुन्हा एकदा येईल. काही अन्य राज्यात भाजपा संतुलन कायम ठेवण्याचे काम करील. परंपरागत रुपात गैर भाजपा राज्यात मोदी-भाजपा यांच्या गतीने काही सहयोगी यांना फायदा मिळेल, इथपत की कोणत्याही सहयोगी शिवाय पक्षाला काही जागा मिळतील.

सरकार स्थापन करण्याची मनिषा असलेले अनेक आहेत. निश्चितपणे सर्वात पुढे भाजपा-नेतृत्ववाली एनडीए आहे. जर कॉग्रेस दोन अंकी आकड्यापर्यंत सिमित राहील तर ती निरस्त होणारी पार्टी असेल. ती कोणत्याही युतीशिवाय केंद्रात असू शकणार नाही. तिस-या आघाडीचे अनेक दावेदार आहेत. एकापेक्षा अधिक राज्यात उपस्थितीसह एकटा दावेदार कदाचितच असेल. पदासाठी सर्वात पुढे असण्याची क्षमता कोणात आहे हे अधिक महत्त्वाचे आहे. आता हा प्रश्न केला जात आहे की, भाजपाच्या नेतृत्वात एनडीए शेवटच्या मैलापर्यंत कशी पोहोचेल?

ही सर्व पुस्तकी तर्क आहेत. राजकीय विश्लेषक याचे समर्थन करतील. जर कोणाला वास्तविक हकीकत माहिती असेल तर हे स्पष्ट होईल की, मोदी यांच्या रॅलींना होणारी गर्दी स्पष्ट संकेत देते की- जो सर्वात पुढे जात आहे त्याचा स्कोर जन सर्वेक्षणांच्या आकलनापेक्षा अधिक आहे. अनेक राज्यात लहान-लहान पक्षांना हे ठरवावे लागेल की, त्यांना पुढे काय करायचे आहे. काही राज्यांत मोठे क्षेत्रीय राजकीय पक्ष देखील आहेत जे राज्यात कॉग्रेसच्या विरोधात पारंपरिक राजकारण करत आले आहेत. केंद्रात समर्थन देऊन अथवा समर्थन मागे घेऊन कॉग्रेससोबत आघाडी कोणती दीर्घकालीन विकल्प नाही आहे. यांमधून अधिकतर पक्षांसाठी सीमित विकल्प आहे. जर मोदी यांची रेटींग 50 टक्के आहे, तर निश्चितपणे याचा प्रत्येक राज्यावर परिणाम होईल. मला आश्चर्य नाही होणार जेव्हा आम्ही शेवटच्या मैलापर्यंत एकटेच पोचू.